p./desktop/Circular

# University of Mumbai

संलग्नता विभाग
ताबडतोब/तात्काळ /हस्ते बटवडा

क्र. संलग्नता/आयसीसी/२०१६-१७/ 23

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
मुंबई विद्यापीठ.

विषय:- महाविद्यालयाचे संलग्नीकरण व अध्यापकांची मान्यता या प्रक्रियेंचे संगणकीकरण करणेबाबत.

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात मा. कुलगुरू महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सर्व संलग्नीत महाविद्यालयांच्या/ संस्थांच्या माहितीचे संगणकीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. सदरील कामाच्या संदर्भात खालील प्रमाणे कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे:

| अ. क्र. | जिल्हाचे नाव | दिनांक | कार्यशाळेचे ठिकाण | वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | मुंबई शहर | ०३/०१/२०१७ | सर कॉवस्जी जहॉगीर दिक्षांत हॉल, फोर्ट कॅम्पस मुंबई - ४०० ०३२ | दु. ११.३० ते ०१.३० |
| २. | मुंबई उपनगर | ०३/०१/२०१७ | सर कॉवस्जी जहॉगीर दिक्षांत हॉल, फोर्ट कॅम्पस मुंबई - ४०० ०३२ | दु. ०२.३० ते ०४.३० |
| ३. | ठाणे जिल्हा, नाशिक जिल्हा व पुणे जिल्हा | ०४/०१/२०१७ | सर कॉवस्जी जहॉगीर दिक्षांत हॉल, फोर्ट कॅम्पस मुंबई - ४०० ०३२ | दु. ११.३० ते ०१.३० |
| ४. | पालघर जिल्हा, रायगड जिल्हा व दादरा नगर हवेली | ०४/०१/२०१७ | सर कॉवस्जी जहॉगीर दिक्षांत हॉल, फोर्ट कॅम्पस मुंबई - ४०० ०३२ | दु. ०२.३० ते ०४.३० |
| ५. | रत्नागिरी जिल्हा | ०५/०१/२०१७ | सर कॉवस्जी जहॉगीर दिक्षांत हॉल, फोर्ट कॅम्पस मुंबई - ४०० ०३२ | दु. ११.३० ते ०१.३० |
| ६. | सिंधुदुर्ग जिल्हा व गोवा | ०५/०१/२०१७ | सर कॉवस्जी जहॉगीर दिक्षांत हॉल, फोर्ट कॅम्पस मुंबई - ४०० ०३२ | दु. ०२.३० ते ०४.३० |

उपरोक्त कार्यशाळेच्या संदर्भात कळविण्यात येते की, महाविद्यालय/संस्थाचे प्राचार्य व संगणकाचे ज्ञान असलेला प्राध्यापक/संगणक तज्ञ प्रतिनिधी यांनी महाविद्यालयाच्या ओळख पत्रासह स्वखर्चाने कार्यशाळेस उपस्थित राहणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी. महाविद्यालयाच्या ज्या कर्मचा-यांकडे सदर काम देण्यात येईल त्यांच्याकडे कायमस्वरूपी हे काम देण्यात यावे, याची कृपया दक्षता घ्यावी.

कार्यशाळेत संबंधीत महाविद्यालयाने महाविद्यालयाची माहिती/ अध्यापकांची सर्व माहिती, विद्यार्थी/ विषय/ अभ्यासक्रम इत्यादी सर्व माहितीचे संकलन कोणत्या प्रपत्रात व कसे सादर करावे याचा तपशील देण्यात येईल. तसेच निरंतर/नैसर्गिक संलग्नीकरण / विस्तारीकरणाचे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिताचे प्रस्ताव ऑन लाईन सादर करण्यासाठीचे प्रशिक्षण सदरील कार्यशाळेत देण्यात येईल. संबंधीत संलग्नीत महाविद्यालयास 'लॉग इन आय.डी' व 'पासवर्ड' निर्मल सॉफ्टवेअर स. प्रा. लि. मार्फत देण्यात येईल. ज्या महाविद्यालयांना कार्यशाळेमध्ये त्यांचे 'लॉग इन आय.डी' व 'पासवर्ड' प्राप्त झाले नसतील अशा महाविद्यालयांना दिनांक ०९/०१/२०१७ नंतर Online AFFILIATION / TAAS Unit कक्ष क्र. २०१, दुसरा मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०० ०३२ येथून वितरण केले जाईल.

या संपूर्ण प्रक्रियेत महाविद्यालयाचे सहकार्य अपेक्षित आहे. तसेच माहिती सादर करताना माहितीच्या सत्यतेबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधीत प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

मुंबई - ४०० ०३२.
30 डिसेंबर,२०१६

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव